

# वारसा वारकरी संतांचा

**ह.भ.प. भारत महाराज जाधव आणि ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज बंडगर यांच्या सहयोगाने संविधान जागर अभियानाद्वारे प्रकाशित.**

**संविधान जागर अभियान निमंत्रक समिती:**
(मा. न्या. बी. जी. कोळसे पाटील, तुषार गांधी, डॉ. राम पुनियानी, डॉ. नितीन राऊत,  मा. न्या. अभय ठिपसे, मा. न्या. तानाजी नलावडे, धनाजी गुरव, नीरज जैन)

**संपर्क पत्ता:** 24, गार्डन लेआऊट, बेझनबाग, नागपूर, महाराष्ट्र – 440 014

**मुद्रक:** आर.एस. प्रिंटर्स, 455, शनिवार पेठ, पुणे – 411 030

**samvidhanjagar.org**

स्वप्निल फुसे: 79723 45764
नागार्जुन वाडेकर: 98602 39899
राजाभाऊ करवाडे: 98222 02739

सामाजिक विषयांवर माहिती मिळवण्यासाठी व्हॉट्सअप क्यूआर कोडला स्कॅन करा!

**सहयोग मूल्य ₹ 15/-**

या पुस्तिकेचे कसलेही कॉपीराईट नाही


आपल्या वारकरी संतांनी लोकांच्या मनात
समता, प्रेम, बंधुता, मानवता या मूल्यांची पेरणी केली.
अवघाचि संसार सुखाचा करीन ।
आनंदे भरीन तिन्ही लोक ॥
समस्त मानवाच्या कल्याणासाठी
व्यापक सामाजिक परिवर्तन घडवून आणणे,
हाच वारकरी संतांचा मूळ उद्देश होता.

# वारकरी संप्रदायाचे मूळ



वारकरी संप्रदाय जनमानसात रुजवण्याचे महत्त्वाचे कार्य संत नामदेव आणि संत ज्ञानेश्वरांनी केले.



संत नामदेव भारत भ्रमणासाठी गेल्यानंतर वारकरी संप्रदायाचे नेतृत्व संत जनाबाईंनी केले.



संत एकनाथ वारकरी संप्रदायाचे आधारस्तंभ आणि संत तुकाराम कळस होते.





संत नामदेवांनी सर्वांना सामावून घेणारी वारकरी कीर्तन परंपरा सुरू केली.

तळागाळातील लोकांना अभंग लिहिण्याची प्रेरणा दिली.

अशा प्रकारे ज्ञानाच्या उजेडाने भेदभावाचा अंधकार दूर केला.

|| नाचू कीर्तनाचे रंगी ज्ञानदीप लावू जगी ||

# वारकरी संतांपूर्वीचा काळ



जातिभेद आणि
अस्पृश्यता होती.





भक्ती आणि ज्ञानावर
पुरोहितांचे वर्चस्व होते.

स्त्रियांना हीन
वागणूक होती.





समाज अंधश्रद्धा–कर्मकांडात
अडकलेला होता.

# संतांनीही भेदभाव सोसला

विठ्ठलाला ‘बाटवले’ म्हणून चोखोबांना बडव्यांनी मारहाण केली.

**धांव घाली विठू आता । चालू नको मंद ॥**
**बडवे मज मारिती । ऐसा काही तरि अपराध ॥**

- संत चोखामेळा

संत नामदेवांचे औंढा नागनाथ येथील मंदिरातील कीर्तन उच्च वर्णियांनी बंद पाडून त्यांना बाहेर हाकलले.



## संतांनी सर्व प्रकारचा भेदभाव नाकारला

**नाना वर्ण गवा । उनका एक वर्ण दूध ॥**
**तुम कहा के ब्राह्मण । हम कहा के सूद ॥**

- संत नामदेव

गाई अनेक रंगांच्या असतात, पण त्यांच्या दूधाचा रंग मात्र एकच असतो. तसेच सर्व माणसांचे खरे स्वरूप एकच आहे.

# अस्पृश्यता नाकारली


**तुकोबाराय म्हणतात,**
**अस्पृश्यतेचे पाप देहान्त प्रायश्चित्तानेही फिटणार नाही.**

**देव बाटवला त्याने ।**
**हासे जनी गाय गाणे ।।**

- संत जनाबाई



चोखोबाच्या स्पर्शाने देव बाटला म्हणणं हे हास्यास्पद आहे.



**नीचाचेनी स्पर्शे देवो विटाळला ।**
**पाणीये प्रक्षाळुनी सोवळा केला ॥**

- संत एकनाथ

देवाला पाण्याने धुवून स्वच्छ करणे म्हणजे देवापेक्षा पाणी जास्त पवित्र आहे, असे समजणे.

**माणसाला हीन वागणूक देणारी अस्पृश्यता संतांनी नाकारली.**

# सर्वांसाठी भक्तीचा खेळ

**खेळ मांडीयेला वाळवंटी घाई ।**
**नाचती वैष्णव भाई रे ॥** - संत तुकोबाराय

अस्पृश्यांना मंदिरात येण्यास बंदी होती. संत नामदेव आणि संत ज्ञानेश्वरांनी भक्तीचा खेळ चंद्रभागेच्या वाळवंटात मांडला. सर्वजण भक्तीच्या खेळात सामील झाले.



**क्रोध अभिमान केला पावटणी । एक एका लागतील पायी रे ॥**
**वर्ण अभिमान विसरली याति । एक एका लोटांगण जाती ॥**

क्रोध, अभिमान यांना पायदळी तुडवून, जाती–वर्णाचा अहंकार विसरून सर्वजण एकमेकांच्या पाया पडू लागले.

**संतांनी अस्पृश्यांसहित सर्वांना ‘माऊली’ बनवले.**


# रोटीबंदी झुगारून सहभोजन

वारकरी संतांनी रोटीबंदीचे नियम झुगारले. सर्व जातीच्या लोकांनी एकमेकांना भरवत सहभोजन करण्याचा काल्याचा विधी सुरू केला.

**उपजोनिया पुढती येऊ । काला खाऊ दहीभात ॥**
**वैकुंठी तो ऐसे नाही । कवळ काही काल्याचे ॥**
**एकमेका देऊ मुखी । सुखी घालू हुंबरी ॥**

- संत तुकोबाराय

हा दहिभाताचा काला खाण्यासाठी आम्ही पुन्हा जन्म घेऊ.
असा मधुर काला तर वैकुंठातही मिळत नाही.
हे काल्याचे घास एकमेकांना भरवू, आनंदात नाचू, गाऊ.



**चोख्याचे अंगणी बैसल्या पंगती ।**
**स्त्री ते वाढीती चोखियाची ॥** - संत एकनाथ

# संतांचा समतेचा विचार

प्रत्येक मनुष्यात ईश्वराचा अंश आहे.
त्यामुळे जन्मावरून होणारा भेदभाव चुकीचा आहे.

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म ।
भेदाभेद भ्रम अमंगळ ॥
- संत तुकोबाराय



या रे या रे लाहान थोर । याति भलते नारीनर ॥
करावा विचार । न लगे चिंता कोणासी ॥
- संत तुकोबाराय

वारकरी संतांनी लहान–मोठे, स्त्री–पुरुष सगळ्यांना सामील करून घेतले. इथे विचार करावा लागत नाही. चिंता करावी लागत नाही.

# संतांचा स्वातंत्र्याचा जागर

सकळांसी येथे आहे अधिकार ।
कलियुगी उद्धार हरीच्या नामे ॥
ब्राह्मण क्षत्रीय वैश्य ।
शुद्र चांडाळाहि अधिकार ॥
बाळें नारीनर
आदि करोनी वेश्या ही ॥

- संत तुकोबाराय






सर्वजण, मग ते कोणत्याही
जाती–कुळाचे असोत,
त्यांना भागवत भक्ती
करण्याचा अधिकार आहे.
अगदी चांडाळ आणि वेश्यांनाही.
आणि भक्तीसाठी कोणत्याही
मध्यस्थाची गरज नाही.

**येथे सर्वांना भक्तीचा अधिकार आहे.**

# लोकांच्या भाषेत ज्ञान


ज्ञान संस्कृत भाषेत अणि उच्च वर्णियांसाठी होते.

**संस्कृत वाणी देवे केली।**
**तरी प्राकृत काय चोरापासुनी झाली?**

- संत एकनाथ




जर संस्कृत भाषा देवाने केली तर
मराठी काय चोरापासून झाली?




## संतांनी लोकभाषेत ज्ञान प्रवाहित केले.

संत ज्ञानेश्वरांनी गीतेवर मराठीत भाष्य केले. तीच ज्ञानेश्वरी. संत नामदेवांनी अभंगाच्या माध्यमातून बहुजनांना लिहिते करून अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा मार्ग खुला केला.


# प्रेमाची शिकवण

## पसायदान

**जे खळांचि व्यंकटी सांडो।**
**तया सत्कर्मी रती वाढो।**
**भुता परस्परे पडो। मैत्र जिवांचे॥**

कुठलीही व्यक्ती नाही तर तिचे गुण
वाईट असू शकतात.

**दुष्टातील दुष्टपणा नष्ट होवो,**
**त्याला सदबुद्धी मिळो;**
**तेव्हाच पृथ्वीवरील सर्व जीव**
**प्रेममय होवून जातील.**



**कोणाही जीवाचा न घडो मत्सर।**
**वर्म सर्वेश्वर पूजनाचे॥** - संत तुकोबाराय

द्वेष–मत्सर सोडून एकमेकांशी
प्रेमभावाने वागण्यातच ईश्वर पूजनाचे सार आहे.

# बंधुता

**तुका म्हणे एका देहाचे अवयव । सुख दुख जीव भोग पावे ॥**

शरीराच्या कुठल्याही अवयवाला दुःख झाले तर ते संपूर्ण शरीराला जाणवते. त्याप्रमाणे कोणत्याही जीवाचा मत्सर आपल्या हातून घडला तर तो इश्वराचा मत्सर केल्यासारखा आहे.



## माणसाने माणसावर प्रेम करणे हाच खरा धर्म आहे.

**पोथी पढ़ि पढ़ि जग मुआ,**
**पंडित भया न कोय,**
**ढाई आखर प्रेम का,**
**पढ़े सो पंडित होय ।**

- संत कबीर

**पुस्तके वाचून कोणी ज्ञानी होत नाही,**
**ज्याला प्रेमाची भाषा कळली तोच खरा ज्ञानी.**

# संत स्त्रिया

स्त्रिया स्वातंत्र्याच्या लायकीच्या नाहीत, त्या पायातली वहाण आहेत.
हे कर्मठ विचार वारकरी संप्रदायाने नाकारले.



वारकरी संत परंपरेत
स्त्रियांना पुरुषांच्या
बरोबरीने सन्मान मिळाला
आणि जनाबाई, सोयराबाई,
मुक्ताबाई अशा अनेक स्त्रिया
संत पदापर्यंत पोहोचल्या.

वेश्येची मुलगी कान्होपात्रा
देखील संत झाली.

डोईचा पदर आला खांद्यावरी ।
भरल्या बाजारी जाईन मी ॥
हाती घेईन टाळ खांद्यावरी वीणा ।
आता मज मना कोण करी ॥

- संत जनाबाई



संत नामदेव
महाराष्ट्राबाहेर गेल्यावर
वारकरी संप्रदायाची धुरा
संत जनाबाईनी सांभाळली.

# रूढी परंपरांना आव्हान

**आजच्या विज्ञानयुगातही मासिक पाळीला अपवित्र म्हणत असंख्य महिलांना घरातील कोपऱ्यात बसवले जाते. 750 वर्षांपूर्वी सोयराबाई म्हणतात,**



**देहासी विटाळ म्हणती सकळ।**
**आत्मा तो निर्मळ शुद्धबुद्ध॥**
**देहिचा विटाळ देहिच जन्मला।**
**सोवळा तो झाला कवण धर्म॥**
**विटाळा वाचोनी उत्पत्तीचे स्थान।**
**कोण देह निर्माण नाही जगीं॥**

- संत सोयराबाई



मन शुद्ध आहे की नाही, हे महत्त्वाचे आहे.
विटाळ नैसर्गिक असून तो शरीरधर्म आहे.

**ज्याला विटाळाची जागा म्हणतो,**
**त्या ठिकाणातून जन्म घेतला नाही**
**असा एक तरी माणूस या जगात आहे का?**

# सर्व धर्म समभाव

## वारकरी संप्रदाय सर्व धर्मांना सामावून घेतो.




**यातायाति धर्म नाही विष्णुदासा ।**
**निर्णय हा ऐसा वेदशास्त्री ॥**

- संत तुकोबाराय

वैष्णवांना कोणतीही जात वा धर्म नसतो
असा वेद शास्त्रांचा निर्णय आहे.

**कबीर मोमीन लतिफ मुसलमान ।**
**सेना न्हावी जाण विष्णुदास ॥**

- संत तुकोबाराय





वारकरी संप्रदायात कबीर,
शेख महंमद, लतीफशाह
हे संत पदापर्यंत पोहोचले. तसेच
शेकडो मुस्लिम वारकरी सत्पुरुष
होऊन गेले.

## संत तुकोबांच्या पालखीचा पहिला विसावा कुठे असतो?

**हजरत सय्यद अनगडशहा बाबांच्या दर्ग्यावर.**



# अंधश्रद्धा–चमत्कार नाकारले

**कपट काही एक । नेणे भुलवायचे लोक ॥**
**दाऊ नेणे जडीबुटी । चमत्कार उठाउठी ॥**

- संत तुकोबाराय

लोकांना भुलवायचं कोणतंही कपट मला माहित नाही. मला कोणतीही जडीबुटी माहित नाही वा चमत्कारांची उठाठेव मी करत नाही.

**नवसे कन्या पुत्र होती । तरी का करणे लागे पती ॥**

- संत तुकोबाराय

**नवस करून जर मुलं होणार असतील तर नवरा करण्याची गरजच काय?**



**सांगो जाणती शकुन । भूत भविष्य वर्तमान ॥**
**त्यांचा आम्हांसी कंटाळा । पाहो नावडती डोळां ॥**

- संत तुकोबाराय

आपल्याला शकुन–अपशकुन, भूत–भविष्य कळते असं म्हणणाऱ्या लोकांकडे प्रत्यक्षात कोणतेही सामर्थ्य नसते.

# अंधश्रद्धांवर–भोंदू बाबांवर प्रहार

**अंगी घेऊनिया वारे दया देती । तया भक्ता हातीं चोट आहे ॥**
**तयांचे स्वाधीन दैवते असती । तरी का मरती त्यांची पोरे ॥**

- संत तुकोबाराय



अंगामध्ये वारे आणून लोकांवर दया दाखवणाऱ्याकडे कुठलीच शक्ती नसते. जर दैवते त्यांच्या स्वाधीन असती तर काही वेळा त्यांची स्वत:चीच मुले मरतात, ती का मेली असती?

**ऐसे कैसे झाले भोंदू । कर्म करूनी म्हणती साधू ॥**
**अंगी लावुनिया राख । डोळे झाकुनिया करती पाप ॥**

- संत तुकोबाराय

संतांनी कर्मकांड, चमत्कार आणि अंधश्रद्धा नाकारल्या आणि स्वत:चा अनुभव, विवेक यांवर विश्वास ठेवून सत्य असत्य निवडण्याचे आवाहन केले.



**सत्य असत्याशी मन केले ग्वाही ।**
**मानियले नाही बहुमता ॥**

- संत तुकोबाराय

# कर्मकांडाला विरोध



**योग याग विधी येणे नोहे सिद्धी ।**
**वायाचि उपाधी दंभ धर्म ॥**

- संत ज्ञानेश्वर

योग यज्ञाच्या विधीमुळे कुठलीही सिद्धी प्राप्त होत नाही, उलट अहंकार येतो.

**भुके नाही अन्न । मेल्यावरी पिंडदान ॥**
**हे तो चाळवाचाळवी । केले आपणचि जेवी ॥**

- संत तुकोबाराय

**जिवंतपणी भुकेलेल्या माणसाला अन्न देत नाहीत आणि तो मेल्यावर पिंडदान देतात. नैवेद्याचे निमित्त करून स्वत:च जेवतात, ही तर फसवाफसवीच आहे.**



# कर्मकांडापेक्षा नामस्मरण श्रेष्ठ

**हेचि माझे तप हेचि माझे दान ।**
**हेचि अनुष्ठान नाम तुझे ॥**

- संत तुकोबाराय

तुझे नाव घेणे हेच माझ्यासाठी तप, दान, तीर्थ आहे; व्रत, धर्म, कर्म आहे; योग, यज्ञ, ज्ञान आहे आणि हीच माझी संपत्ती आहे.




**न लगे तीर्थाचे भ्रमण ।**
**न लगे दंडण–मुंडण ॥**
**न लगे पंचाग्नी साधन**
**तुम्ही वासुदेव वासुदेव म्हणा ॥**

- संत एकनाथ

लोक मुक्ती मिळवण्यासाठी आयुष्यभर कर्मकांड, तपश्चर्या करतात.

**वारकरी संतानी सांगितले, हे सर्व करू नका, विठ्ठलाचे नामस्मरण करा.**

# स्वर्ग–मोक्ष कल्पनांना धुडकावले



तुका म्हणे आम्हां ।
मोक्षाचा कंटाळा ।
मोक्षाएवढे सुख ।
सुख नव्हेचि ते दुःख ॥

- संत तुकोबाराय

**आम्हांला मोक्षाचा कंटाळा आहे कारण मोक्ष हे सुख नसून दुःख आहे.**

**देवाचिये द्वारी उभा क्षणभरी । तेणे मुक्ती चारी साधियेल्या ॥**
**हरी मुखे म्हणा हरी मुखे म्हणा । पुण्याची गणना कोण करी ॥**

- संत ज्ञानेश्वर

देवाच्या दारात क्षणभर जरी उभे राहिले तरी चारही प्रकारच्या मुक्ती मिळतात. मुखाने फक्त ‘हरी’ म्हटले तरी मोजता येणार नाही एवढे पुण्य मिळते.

# श्रमाला प्रतिष्ठा

वारकरी संतांनी श्रमालाच देव मानले.

**कांदा मुळा भाजी । अवघी विठाई माझी ॥**
**लसूण मिरची कोथिंबिरी । अवघा झाला माझा हरी ॥**

- संत सावतामाळी



**चर्म रंगू लागे रोहिदासा संगे । कबिराचे मागे शेले विणी ॥**
**सज्जन कसाया विकू लागे मास । मळा सावत्यास खुरपू लागे ॥**

- संत तुकोबाराय

**देव माणसांच्या उच्च-नीच स्थितीला नाही,**
**तर त्यांच्या मनातील भावनेला आणि प्रेमाला महत्त्व देतो.**
**म्हणूनच तो रोहिदासासंगे चामडे रंगवतो,**
**कबिराच्या मागे शेले विणतो.**

# माणसातच देव

देहीं असोनिया देव ।
वृथा फिरतो निर्दैव ॥
देव आहे अंतर्यामीं ।
व्यर्थ हिंडे तीर्थग्रामीं ॥

- संत तुकोबाराय



देव आपल्या अंतर्यामीच असतो, परंतु आपण त्याचा शोध घेण्यासाठी उगाचच तीर्थक्षेत्रं फिरत बसतो.

## माणसाची सेवा हीच ईश्वरसेवा

जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले ॥
तोचि साधू ओळखावा । देव तेथेचि जाणावा ॥

- संत तुकोबाराय

जे दु:खी, पीडित लोक आहेत त्यांना जो आपलेसे करतो, त्यांची जो सेवा करतो अशा माणसातच देव आहे.

# लोककल्याणाचा विचार

वारकरी संतांनी लोकांना दु:खातून मुक्त करण्यासाठी आयुष्य वेचले.

**बुडता हे जन न देखवे डोळां ।**
**येतो कळवळा म्हणउनि ॥** - संत तुकोबाराय



लोकांचे जीवन दुःखाने उद्ध्वस्त होत आहे, ते बघून मनात कळवळा निर्माण होत आहे.

**जगाच्या कल्याणा**
**संतांच्या विभूति ।**
**देह कष्टविती**
**पर उपकारें ॥**

- संत तुकोबाराय

लोकांच्या कल्याणासाठीच संतांनी आपले आयुष्य समर्पित केले.

**जो जे वांच्छिल तो ते लाहो । प्राणिजात ॥**

- संत ज्ञानेश्वर

**प्रत्येकाला त्याच्या जीवनावश्यक गरजांनुसार मिळालं पाहिजे.**

# संत विचार आणि स्वराज्य

**छत्रपती शिवाजी महाराजांनी वारकरी संतांचा विचार आणि झेंडा घेऊन राज्यकारभार केला.**

**तुकोबाराय आणि शिवराय यांचे कार्यक्षेत्र एकच.**

अन्यायाविरुद्ध लढण्याची आणि स्वराज्याच्या महान कार्यात सामील होण्याची प्रेरणा देण्यासाठी जगद्गुरू तुकोबारायांनी 'पाईकीचे' (सैनिक) अभंग रचले. लढाईचं तंत्र सांगितलं. स्वामीनिष्ठा शिकवली.



**पाईक तो प्रजा राखोनियां कुळ । पारखिया मूळ छेदी दुष्टा ॥**
**तो एक पाईक पाइकां नाईक । भाव सकळीक स्वामिकाजीं ॥**

जो दुष्ट शत्रू सैनिकांचा नाश करून प्रजेचे रक्षण करतो तोच खरा स्वामिभक्त सैनिक.

**वारकरी संतांनी केलेल्या वैचारिक मशागतीमुळेच शिवरायांना निष्ठावंत मावळे लाभले.**

# संत विचार आणि स्वराज्य

छत्रपती शिवाजी महाराजांनी वारकरी संतांचा
विचार घेऊन राज्यकारभार केला.



शिवरायांच्या राज्यात प्रजेच्या अन्न, वस्त्र आणि निवारा
या जीवनावश्यक गरजा पूर्ण होत;
स्त्रियांचा सन्मान केला जाई;
जातिभेद आणि धर्मभेद केला जात नसे;
कोणावरही अन्याय, जुलूम-जबरदस्ती होत नसे;
शेती, व्यापार आणि उद्योगांचा विकास होत होता;
ह्या विकासाचा लाभ सर्व प्रजेला मिळत होता;
प्रजा सुखासमाधानाने नांदत होती.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

**वारकरी संप्रदायाप्रमाणेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी भक्तीला बंधुता आणि मानवतेची जोड दिली.**

**या भारतात बंधुभाव नित्य वसू दे। दे वरचि असा दे।**
**हे सर्व पंथ, संप्रदाय एक दिसू दे। मतभेद नसू दे॥**



**गोरगरिबांचे कल्याण, जातिभेद–अस्पृश्यता निर्मूलन, सर्वधर्मसमभाव, महिलांची प्रगती यासाठी तुकडोजी महाराजांनी प्रयत्न केले.**

पंढरपूरचे विठ्ठल मंदिर दलितांना खुले करण्यासाठी साने गुरुजींनी उभारलेल्या लढ्याला त्यांनी पाठिंबा दिला.

**जैसे बापास पुत्र सारिखे। तैसे गरीब श्रीमंत राजाचे सखे।**
**हा भेद मिटविणें काम निकें। त्याचेंचि असे राजधर्मे॥**

जशी बापाला सर्व मुलं सारखी असतात तशीच शासनाला गरीब, श्रीमंत सारखे असतात. ही विषमता मिटवणे हाच शासनाचा खरा राजधर्म आहे.

# संत गाडगेबाबा

माणसात देव शोधणारे आधुनिक काळातील कृतीशील संत म्हणजे गाडगेबाबा. त्यांच्यावर वारकरी संप्रदायाचा आणि सत्यशोधक विचारांचा मोठा प्रभाव होता. गाडगेबाबा तुकोबारायांना गुरू मानत. त्यांनी कीर्तनाच्या माध्यमातून समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, अनिष्ठ रुढी दूर करण्यासाठी प्रयत्न केले.



## गाडगेबाबांची दशसूत्री

भुकेलेल्यांना अन्न
तहानलेल्यांना पाणी
उघड्या-नागड्यांना कपडे
गरीब मुलामुलींना शिक्षण
बेरोजगारांना रोजगार
बेघराला आधार
आजारी लोकांना औषध
मूक प्राण्यांना संरक्षण
गरीब तरुण-तरुणींचे सुगम लग्न
दु:खी व निराशांना हिंमत

गाडगेबाबांची दशसूत्री अंमलात आणणे म्हणजेच लोककल्याण होय आणि हाच संविधानाचाही मुख्य उद्देश आहे.

# वारकरी संत आणि संविधान



वारकरी संत
विचारांतील मूल्ये
डॉ. बाबासाहेब
आंबेडकरांनी
संविधानात उतरवली.




## स्वातंत्र्य

सकळांसी येथे आहे अधिकार

## स्त्री पुरुष समानता

स्त्री जन्म म्हणवुनि
न व्हावें उदास ।
साधुसंतां ऐसें केलें मज ।।

## बंधुता

जे खळांची व्यंकटी सांडो ।
तया सत्कर्मी रती वाढो ।
भुता परस्परे पडो । मैत्र जीवांचे ।।

## समता

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म ।
भेदाभेद भ्रम अमंगळ ।।

# वारकरी संत आणि संविधान




## समाजवाद

जो जे वांच्छिल तो तें लाहो ।
प्राणिजात ।।

## धर्मनिरपेक्षता

यातायाती धर्म नाही विष्णुदासा

## सामाजिक न्याय

जे का रंजले गांजले ।
त्यासी म्हणे जो आपुले ।।

## वैज्ञानिक दृष्टिकोन

नवसे कन्या पुत्र होती ।
तरी का करणे लागे पती ।।

## पर्यावरण रक्षण

वृक्ष वल्ली आम्हां सोयरीं वनचरें ।
पक्षी ही सुस्वरें आळविती ।।

# भागवत धर्माची शिकवण

**वारकरी संप्रदाय सर्वसमावेशक असल्यामुळेच साडेसातशेहून अधिक वर्षे टिकून आहे.**

वारकरी संप्रदायालाच भागवत धर्म म्हटले जाते.
ज्याच्या मनात इतरांविषयी दया, क्षमा, शांती आहे तोच भागवत.

आज समाजात जातीय–धार्मिक द्वेष, हिंसा वाढलेली दिसते. सर्वसामान्य माणूस जगण्याच्या मूलभूत प्रश्नांनी बेजार झालेला दिसतो. अशा काळात वारकरी संप्रदायाचे समता–बंधुतेचे मूळ विचारच समाजाला तारू शकतात.



ते विचार समजून घेऊन लोकांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी आपल्या प्रत्येकाची आहे. तेव्हाच वारकरी संतांना अभिप्रेत समाज निर्माण होईल.

**आम्हां सापडले वर्म । करू भागवत धर्म ।।**